**मराठीसाठी:**

Size : **5.0 x 8.0 cm**

# महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिक्षा मंडळ

**१३२/ब, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद इमारत, भांबुर्डा, पुणे-४११ ००७**

**दुरध्वनी क्र. ०२०-२५५२८५१९/११९ ई-मेल: cetmauebpune@gmail.com**

## निवेदन - १

**(Ph.D.-CET-2026)**

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांतील आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची **सामाईक प्रवेश परीक्षा-२०२६ (Ph.D.-CET-2026)** माहे संभाव्यतः ऑक्टोबर, २०२६ मध्ये घेण्याचे नियोजित आहे. त्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याची प्रक्रिया **दि.१६.७.२०२६ ते ३०.७.२०२६** या कालावधीत होणार आहे. प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या **www.mcaer.org** या संकेतस्थळावर उपलब्ध लिंक मार्फत ऑनलाईन अर्ज भरावेत.

स्थळः पुणे

दिनांकः १६.०७.२०२६

स्वाक्षरीत/-

**नियंत्रक**

**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिक्षा मंडळ,**

**पुणे**

इंग्रजीसाठी:

Size: **5.0 x 8.0 cm**

# Maharashtra Agricultural Universities Examination Board

**MCAER Building, Bhamburda, Pune - 411 007**

**Phone No. 020-25528519/119** **E-mail: cetmauebpune@gmail.com**

## NOTIFICATION-1

**(Ph.D.-CET-2026)**

The **Common Entrance Test-2026 (Ph.D.-CET-2026) for admission to the Doctoral (Ph.D.) Degree Programmes** offered by the four Maharashtra State Agricultural Universities (SAUs) for the Academic Year, 2026–27 is tentatively scheduled to be conducted in October 2026. The online application process will be available from **16th to 30th July, 2026**. Eligible candidates desirous of seeking admission are advised to submit their online applications within the stipulated period through the relevant link available on the official website of the Maharashtra Council of Agricultural Education and Research (MCAER), Pune, at **www.mcaer.org**.

Place: Pune
Date: 16.7.2026

*Sd/-*
**Controller**
**Maharashtra Agricultural Universities Examination Board, Pune**

**MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES**
**EXAMINATION BOARD**
**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ**

**MCAER Building, 132/B, Bhosalenagar, Pune – 411007**

020-25528519/119 https://www.mcaer.org/maueb.html E-mail: mauebpune@yahoo.co.in

No. MAUEB/Ph.D.-CET-2026/**188**/26 Date: 15/07/2026

## प्रसिध्दीसाठी बातमी - १

## [Ph.D.-CET-2026]

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणाऱ्या विविध विद्याशाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी **आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची सामाईक प्रवेश परीक्षा-२०२६ (Ph.D.-CET-2026) महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे** यांचे मार्फत संभाव्यतः माहे **ऑक्टोबर, २०२६** मध्ये महाराष्ट्रातील विविध परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे.

सदर परीक्षेसाठी संबंधित विद्याशाखेचे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे पदवीधर तसेच, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम सत्रांत परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहातील. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर उमेदवाराने स्वतः भरावयाचे आहे. **अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे.** ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी **दि. १६.७.२०२६ ते ३०.७.२०२६** असा राहील.

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने नेट बँकीग/ युपीआय/ डेबिट/ क्रेडीट कार्डव्दारे **दि. १६.७.२०२६ ते दि. ३१.७.२०२६** पर्यंत स्वीकारले जाईल. ह्या परिक्षेसंबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांच्या कार्यालयाकडे स्वतंत्रपणे पाठविण्याची आवश्यकता नाही.

आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची सामाईक प्रवेश परीक्षा-२०२६ (Ph.D.-CET-2026) संदर्भातील अनुषंगिक बाबी जसे की, संभाव्य पात्र-अपात्र उमेदवारांची यादी, अर्जाबाबतच्या तक्रारींचे निवारण कालावधी, अंतिम पात्र उमेदवाराची यादी व परीक्षा प्रवेश पत्र (Admit Card) डाऊनलोड करणे, सदर सामाईक प्रवेश परीक्षेचा संभाव्य दिनांक, उत्तरतालिका व परीक्षेचा निकाल प्रसिध्द करावयाचा कालावधी वेळोवेळी **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, सदर परीक्षेच्या वेळापत्रकात काही बदल झाल्यास तसे संकेतस्थळावर अधिसुचित करण्यात येईल. या परिक्षेसंदर्भात अधिक माहितीसाठी ०२०-२५५२८५१९/११९ या दूरध्वनी क्रमाकांवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा किंवा **cetmauebpune@gmail.com** या ई-मेल वर कळवावे, असे नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे कार्यालयाव्दारे कळविण्यात आलेले आहे.

स्थळ : पुणे-७
दिनांक : १५.७.२०२६

**नियंत्रक**
**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे**